**समाज विकास विभाग**
पुणे महानगरपालिका
जावक क्र. सविवि/१०८०
दिनांक ३/१०/२०१६

# कार्यालयीन परिपत्रक

मा. अति. महापालिका आयुक्त (ज.), पुणे महानगरपालिका यांनी ठराव क्र. ८/२५४, दि. ३०/०९/२०१६ नुसार स्मार्ट सेवा सहकारी संस्थेकडून एकूण २३० स्मार्ट सेवकांचे (संगणक ऑपरेटर) देयक अदा करणेकरीता मुख्य लेखा व वित्त कार्यालयाकडील जावक क्र. मुले/१४१०, दि. १२/०९/२०१६ च्या निवेदनात ''क्ष'' येथे नमूद केलेनुसार कार्यवाही करणेस आदेश दिलेले आहेत. त्यानुसार मा. सर्व खातेप्रमुखांनी कार्यवाही करणेत यावी.

तसेच सोबतच्या पत्रानुसार सर्व स्मार्ट सेवकांची (संगणक ऑपरेटर) हजेरी पुढील महिन्याचे २ तारखेपर्यंत स्मार्ट सेवा सहकारी संस्था मर्या. यांचेकडे पाठविणेची दक्षता घेणत यावी.

कळावे.

03/10/2016

**मुख्य समाज विकास अधिकारी**
समाज विकास विभाग
पुणे महानगरपालिका

**प्रत कार्यवाहीसाठी :-**
मा. सर्व खाते प्रमुख,
पुणे महानगरपालिका

**प्रत माहितीसाठी :-**
१. मा. अति. महापालिका आयुक्त (ज.)
२. मा. मुख्य लेखा व वित्त अधिकारी
पुणे महानगरपालिका

**खात्याचे नाव :–**
पुणे महानगरपालिका
जा. क्र.
दि.

**प्रति,**
**मा. अध्यक्ष,**
मे. स्मार्ट सेवा सहकारी संस्था मर्या.,
शिवाजीनगर, पुणे ४११ ००५

यांसी....

**विषय :– स्मार्ट सेवा सहकारी संस्था (म)कडील संगणक ऑपरेटर यांचे माहे ................ २०१६ चे हजेरी बिलाबाबत.**

विषयांकित प्रकरणी ........................................... विभागाकडील खालील संगणक ऑपरेटर यांचे काम समाधानकारक असून माहे ...................... २०१६ चे वेतन आदा करणेस आमची शिफारस आहे.

| अ. क्र. | संगणक ऑपरेटरचे नाव | प्रत्यक्ष हजर दिवस दिनांक | हजर दिवस संख्या | गैरहजर दिनांक | कार्यालयीन सुट्टी दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १. | | | | | |
| २. | | | | | |
| ३. | | | | | |
| ४. | | | | | |

कळावे.

खातेप्रमुखांची स्वाक्षरी
खातेप्रमुखांचे नाव
खातेप्रमुखांची पदनाम
खात्याचे नाव
पुणे महानगरपालिका

मुख्यलेखा व वित्त कार्यालय
पुणे महानगरपालिका
जावक क्रमांक : मु/ले/१४९० 
दिनांक: ९ /०९/२०१६

मा. अति. महापालिका आयुक्त (ज),
पुणे महानगरपालिका

यांजकडेस सविनय सादर ...

विषय:- स्मार्ट सेवा सहकारी संस्थेकडून एकूण २३० स्मार्ट सेवकांचे (संगणक ऑपरेटर) देयक अदा करणेबाबत.

संदर्भ:- १) मा. अति. महापालिका आयुक्त (ज) ठराव क्रमांक ८/१२३ दिनांक १/७/२०१६

पुणे महानगरपालिकेच्या विविध क्षेत्रिय कार्यालयाकडे व मुख्य खात्याकडे संबंधित खात्याच्या मागणीनुसार २३० संगणक ऑपरेटर यांची सहा महिने कालावधीकरीता संदर्भांकित ठरावान्वये नियुक्त करण्यास मान्यता मिळालेली आहे.

संबंधित संगणक ऑपरेटर यांची नियुक्ती करताना मा. मुख्य कामगार अधिकारी, पुणे म.न.पा. यांनी दिलेल्या अभिप्रायानुसार प्रति सेवकास किमान वेतन दरानुसार दैनिक वेतन रक्कम रुपये ४६६= १६ याप्रमाणे महिनेमहा एकवट वेतन रक्कम रुपये १२,१२०/- देणे असून त्यामधून संबंधित स्मार्ट सेवकांचे ई.पी.एफ.,ई.एस.आय.,कामगार कल्याण निधी व व्यवसाय कर इत्यादी कामगारांचा हिस्सा वजावट करुन ती सक्षम प्राधिकाऱ्याकडे जमा करावे तसेच या व्यतिरिक्त स्मार्ट सेवा सहकारी संस्थेस पर्यवेक्षकीय शुल्क म्हणून ५% रक्कम अदा करणेबाबत नमूद केले आहे.

वरीलप्रमाणे नेमणूक करण्यात आलेले संगणक ऑपरेटर पुणे म.न.पा. च्या विविध खात्यात तसेच विविध क्षेत्रिय कार्यालयात कार्यरत असून सध्या संबंधित खाती त्यांची स्वतंत्र महिनेमहाची देयके अदा करणेसाठी लेखा विभागाकडे तपासणीसाठी सादर करीत आहे. सदरच्या देयकाची तपासणी करीत असताना काही त्रुटी आढळून येत असून त्यामध्ये प्रामुख्याने सदर सेवकांच्या संख्येवर ठेवावयाचे नियंत्रण, दुबार देयके तसेच मा. मुख्य कामगार अधिकारी, पुणे म.न.पा. यांनी दिलेल्या अभिप्रायानुसार संबंधित सेवकांचे ई.पी.एफ.,ई.एस.आय.,कामगार कल्याण निधी व व्यवसाय कर इत्यादी सक्षम प्राधिकाऱ्याकडे वेळोवेळी जमा होत आहे अगर कसे याची पडताळणी होणे आवश्यक आहे.

सदर बाबीवर प्रशासनाचे नियंत्रण आवश्यक असल्याने संबंधित सेवक ज्या विभागाकडे कार्यरत आहे त्या विभागाकडील मा. खातेप्रमुख यांच्या स्वाक्षरीने सदर सेवकाची हजेरी स्मार्ट सेवा सहकारी संस्थेने एकत्रित करुन मा. मुख्य समाज विकास अधिकारी पुणे म.न.पा. यांच्या मार्फत देयक अदा करणेसाठी सादर केल्यास त्यामध्ये पारदर्शकता येऊन संबंधित सेवकांचे ई.पी.एफ., ई.एस.आय., कामगार कल्याण निधी व व्यवसाय कर इत्यादी बाबतच्या योग्य नोंदींची तपासणी व खातरजमा मुख्य समाज विकास विभागामार्फत केल्यास त्यांची देयके वेळेवर अदा करणे शक्य होईल.

तरी मा. अति. महापालिका आयुक्त (ज) यांची खालील बाबींस मान्यता मिळणेस विनंती आहे.

१) पुणे म.न.पा. कडील सर्व खाती व सर्व क्षेत्रिय कार्यालयाकडे नियुक्त करण्यात आलेल्या स्मार्ट सेवकांची हजेरी संबंधित खातेप्रमुखांच्या स्वाक्षरीने स्मार्ट सेवा सहकारी संस्थेमार्फत एकत्रित करुन ती मुख्य समाज विकास विभागाकडे सादर करण्यास.
२) स्मार्ट सेवा सहकारी संस्थेने सादर केलेल्या देयकांची खातरजमा करताना किमान वेतन कायद्याच्या अनुषंगाने करावयाची कार्यवाही, त्या बाबतच्या रजिस्टरमधील नोंदी व कागदपत्रांची तपासणी मुख्य समाज विकास विभाग यांचेमार्फत करण्यास.
३) नियुक्त केलेले सेवकांना महिनेमहाचे किमान वेतन जादा व दुबार होणार नाही याची संबंधितांनी दक्षता घेण्यास.
४) या सर्व स्मार्ट सेवकांच्या मुशाहिऱ्यावर होणारी ५% रक्कम स्मार्ट सेवा सहकारी संस्थेस एकवट होणाऱ्या बिलामध्ये समाविष्ट करणेस.
५) सर्व स्मार्ट सेवा सेवकांचे एकत्रितरित्या महिनेमहा वेतनापोटी एकच अदा बील फॉर्म करुन त्यासोबत सर्वांची हजेरी मुळ मान्य प्रकरणासह मुख्य समाज विकास विभाग यांनी मुख्यलेखा व वित्त विभागाकडे सादर करणेस.

मा. स. कळावे,

| | | | |
|---|---|---|---|
| (श्री. बामणे कै.ना.) | ((श्री. कल्याणकर संजय) | (श्री. झांजरे जी.एम.) | (सौ. कळसकर) |
| वरिष्ठ लिपीक | अधीक्षक | प्रशासन अधिकारी | मुख्यलेखा व वित्त अधिकारी |
| पुणे महानगरपालिका | पुणे महानगरपालिका | पुणे महानगरपालिका | पुणे महानगरपालिका |

(ज) कार्यालय
...क क्रमांक २१९८६७
दिनांक- 16 SEP 2016
पुणे महानगरपालिका

दु.३.५५

मा. मुख्य समाज विकास अधिकारी,
यांजकडेस,
कृ. अभिप्रायासह फेरसादर करणेस
विनंती आहे.
मा. कळावे.

प्रशासन अधिकारी
अति.म.न.आयुक्त (ज)कार्यालय
पुणे महानगरपालिका

मुख्य समाज विकास अधिकारी
(स.वि.वि.) कार्यालय
पुणे महानगरपालिका
आवक क्रमांक २३०८
दिनांक १९/९/२०१६

मुख्य समाज विकास अधिकारी
समाज विकास विभाग
पुणे महानगरपालिका

समाज विकास विभाग
पुणे महानगरपालिका
जावक क्र. सविवि/१००८
दिनांक – २२/०८/२०१६

मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज.)
पुणे महानगरपालिका

यांजकडेस सविनय सादर....

**विषय :– स्मार्ट सेवा सहकारी संस्थेकडून एकूण २३० स्मार्ट सेवकांचे (संगणक ऑपरेटर) देयक अदा करणेबाबत.**

संदर्भ :– १) मा. अति. महापालिका आयुक्त (ज.), पुणे महानगरपालिका यांनी ठराव क्र. ८/१२३, दि. ०१/०७/२०१६
२) मा. अति. महापालिका आयुक्त (ज.) कार्यालयाकडील जा. क्र.अतिमआज/सविवि/६८२, दि. १८/७/२०१६ रोजीचे कार्यालयीन परिपत्रक
३) मुख्य लेखा व वित्त कार्यालय, पुणे महानगरपालिका यांचेकडील जावक क्र. मुले/१४१०, दि. १२/९/२०१६ रोजीचे पत्र.
४) समाज विकास विभागाकडील आवक क्र. २३०८, दि. १९/९/२०१६ रोजीचे पत्र.

स्मार्ट सेवा सहकारी संस्था मार्फत पुणे महानगरपालिकेच्या विविध खात्यांमध्ये कार्यरत असणाऱ्या आवश्यक संगणक ऑपरेटर यांची स्मार्ट सेवा सहकारी संस्थेमार्फत खात्यांच्या आवश्यकतेनुसार व गरज असल्यास नियुक्ती करणेकरीता मा. अति. महापालिका आयुक्त (ज.), पुणे महानगरपालिका यांनी ठराव क्र. ८/१२३, दि. ०१/०७/२०१६ अन्वये मान्यता दिलेली आहे.

संदर्भ क्र. ३ अन्वये मा. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, पुणे महानगरपालिका यांनी संगणक ऑपरेटर ज्या विभागाकडे कार्यरत आहे त्या विभागाकडील मा. खातेप्रमुख यांच्या स्वाक्षरीने सदर सेवकांची हजेरी स्मार्ट सेवा सहकारी संस्थेने एकत्रित करून मा. मुख्य समाज विकास अधिकारी, पुणे म.न.पा. यांच्या मार्फत देयक अदा करणेसाठीचा प्रस्ताव आपले मान्यतेस्तव सादर केला आहे.

संदर्भ क्र. ४ अन्वये मा. प्रशासन अधिकारी, अति. महा. आयुक्त (ज.) कार्यालय, पुणे महानगरपालिका यांनी आमचे विभागास अभिप्रायासह फेरसादर करणेस कळविले आहे.

त्यानुसार समाज विकास विभागाचा खालीलप्रमाणे अभिप्राय देणेत येत आहे.

१) पुणे म.न.पा. कडील सर्व खाती व सर्व क्षेत्रिय कार्यालयाकडे नियुक्त असलेल्या स्मार्ट सेवकांची हजेरी संबंधित खात्यांकडून मुदतीत एकत्रित करणे अडचणीचे आहे.
२) स्मार्ट सेवा सहकारी संस्थेमार्फत प्रत्येक संगणक ऑपरेटर यांचे ई.एस.आय., ई.पी.एफ. व कामगार कल्याण निधी इत्यादींचे स्वतंत्र खाते उघडून विहित रक्कम जमा केली जाणार आहे. यासाठी स्वतंत्र

...२//

रजिस्टर संस्थेमार्फत ठेवले जाणार आहे. सदरचे रजिस्टर [illegible] अधिकारी यांचेकडून दरमहा तपासणी करणेत येईल व त्याचा अहवाल मुख्य कामगार अधिकारी, पुणे महानगरपालिका यांचेकडे सादर केला जाईल.

३) नियुक्त केलेले सेवकांना महिनेमाहचे किमान वेतन जादा व दुबार होणार नाही याची दक्षता संबंधित खात्याने घेणेत यावी.

४) या सर्व स्मार्ट सेवकांच्या मुशाहिऱ्यावर होणारी ५% रक्कम स्मार्ट सेवा सहकारी संस्थेस एकवट होणाऱ्या बिलामध्ये समाविष्ट करणेची दक्षता संबंधित खात्याने घेणेत यावी.

५) संदर्भ क्र. ३ अन्वये मा. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, पुणे महानगरपालिका यांनी सर्व स्मार्ट सेवा सेवकांचे एकत्रितरित्या महिनेमहा वेतनापोटी एकच बिल फॉर्म करून त्यासोबत सर्वांची हजेरी मूळ मान्य प्रकरणासह मुख्य समाज विकास विभाग यांनी मुख्य लेखा व वित्त विभागाकडे सादर करणेस मान्यतेस्तव कळविले आहे. तथापि पुणे महानगरपालिका, समाज विकास विभागाकडे विविध कल्याणकारी योजना, उपक्रम, प्रकल्प सुरू असून सदर कामांसाठी सेवक वर्गाची कमतरता आहे. तसेच किमान वेतन कायद्यानुसार सदर संगणक ऑपरेटर यांना दरमहा ७ तारखेच्या आत वेतन अदा करावयाचे आहे. त्यामुळे सदर बाबींचा विचार करता स्मार्ट सेवा सहकारी संस्थेकडे मनपाच्या विविध खात्यांकडून एकत्रित हजेरी करणेस बराचसा कालावधी जाणेची शक्यता असल्याने व समाज विकास विभागाकडे मनुष्यबळाची कमतरता असल्याने संगणक ऑपरेटर यांचे एकत्रित बिल करणे अडचणीचे आहे.

तरी वरील निवेदनाचा अवलोकन करता मा. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, पुणे महानगरपालिका यांनी संदर्भ क्र. ३ अन्वये सादर केलेल्या प्रस्तावातील अ. क्र. १, ३, ४, ५ ची अंमलबजावणी समाज विकास विभागामार्फत करता येणार नाही. सदर प्रस्तावातील अ. क्र. २ ची अंमलबजावणी समाज विकास विभागामार्फत करणेत येईल, हि विनंती.

मा. स. कळावे.

पुणे महानगरपालिका
मा. अति. महापालिका आयुक्त (ज./वि./)
ठराव क्र. ६/२५४
दिनांक ३०/०९/१६

(रामदास चव्हाण)
**समाज विकास अधिकारी**
समाज विकास विभाग
पुणे महानगरपालिका

(गणेश सोनुने)
**मुख्य समाज विकास अधिकारी**
समाज विकास विभाग
पुणे महानगरपालिका

मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचे जा.क्र. १४७० दि. १२/०९/२०१६ चे निवेदन व मुख्य समाज विकास अधिकारी यांचा उपरोक्त अभिप्राय अवलोकन केला.
मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचे दि. १२/०९/१६ चे निवेदनात "ब" येथे नमूद केलेनुसार कार्यवाही करावी.

अति. महापालिका आयुक्त (ज.) कार्यालय
आवक क्रमांक 219030
दिनांक - 22 SEP 2016
महानगरपालिका

(प्रशांत ब. जगताप)
अति. महा. आयुक्त (जनरल)
**पुणे महानगरपालिका**

D:\NEW_UCD3\Smart Seva Sahkari Santha\Sanganak Oprator babat.doc